# कासारवडवली वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.deptraffic@mahapolice.gov.in

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ९१० /२०२५ दि. १८/०७/२०२५

## –: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

**ज्याअर्थी, कासारवडवली** वाहतूक उप विभागाचे हद्दीत काशीनाथ घाणेकर सर्कल ते जेमीनी बिल्डींग ते सुर्या टॉवर परिसरात वाहनांची मोठया प्रमाणात वाढ झाल्याने तेथील सार्वजनिक वाहतुकीस व रहदारीस अडथळा व वाहतुक कोंडी निर्माण होउन नागरीकांची गैरसोय होते आहे. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये, वाहतूक सुरळीत व सुनिश्चित होण्यासाठी खालील ठिकाणी पार्किंग व्यवस्था होणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी**, मी, **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र.एम.व्ही.ए./११६/सीआर/३७/टीआर,दि.२७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५,११६ (१) (अ) (ब) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून खालीलप्रमाणे वाहतूक अधिसूचना जारी करीत आहे. :–

- **खालील नमूद ठिकाणी हॉस्पीटल, गृह सकुले, धार्मिक स्थळांचे प्रवेशव्दार व बस स्टॅाप सोडुन रस्त्याच्या फुथपाथ लगत दोन चाकी व कार चारचाकी वाहनां करीता खालील प्रमाणे पार्कींग व्यवस्था करण्यात येत आहे.**

| अ.क्र. | पार्किंगचे ठिकाण | प्रकार | अंतर | वेळ |
|---|---|---|---|---|
| १ | काशीनाथ घाणेकर सर्कल ते जेमीनी बिल्डींग सर्कल पावेतो | **पी–१,पी–२ पार्कींग** | ६०० मिटर | २४ तास |
| २ | जेमीनी बिल्डींग सर्कल ते सुर्या टॉवर पावेतो दोन्ही बाजुस | **समातंर पार्कींग** | ६०० मिटर | २४ तास |
| ३ | सुर्या टॉवर ते सार्वजनिक शौचालय डिव्हए स्कुल कॉर्नर पावेतो दोन्ही बाजुस | **नो पार्कींग झोन** | ३०० मिटर | २४ तास |

वर नमूद ठिकाणी **पार्किंग व्यवस्था** बाबत अधिसूचना प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासून ३० दिवस प्रायोगिक तत्वावर लागू करण्यात येत आहे. काही हरकत अगर सूचना असल्यास त्या लेखी स्वरुपात पोलीस उप आयुक्त, शहर वाहतूक शाखा कार्यालय, तीन हात नाका, ठाणे ४००६०२ येथे पाठवाव्यात. याबाबत कोणाच्या काही हरकत अथवा आक्षेप प्राप्त न झाल्यास सदर अधिसूचना पुढील आदेश होईपावेतो कायम स्वरुपात अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडॉर, ऑक्सिजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

**( पंकज शिरसाट )**
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.

२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर :–**

मा. जिल्हाधिकारी, ठाणे

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर

मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर

CamScanner

मा. आयुक्त ठाणे महानगरपालिका, ठाणे
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–५/विशे । शाखा, ठाणे
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे
विभाग नियंत्रक, राज्य परिवहन विभाग, ठाणे
पोलीस उप आयुक्त अर्थिक गुन्हे शाखा, ठाणे शहर

<u>प्रत</u> :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे,ठाणे शहर
२/– सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

<u>प्रत</u> :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे
२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी

<u>प्रत</u> :– सपोआ, ठाणे वाहतूक विभाग, पोनि. कासारवडवली, कापूरबावडी, वाहतूक उप विभाग, ठाणे  हर
२/– म.न.पा. ठाणे च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सूचना फलके लावून घ्यावी.

CamScanner